# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर-४३१००५

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

Telephone : 0240-2334025 Email.rbteau@msbte.com Web : www.msbte.org.in

जाक्रं.मरातंशिमं/प्राका/छ.संभाजीनगर/का-७०/२०२४/ 240 दिनांक : 21 FEB 2024

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाशी संलग्नीत सर्व संस्था.

विषय:- संस्थेतील द्विव्यांग परीक्षार्थींकरीता उन्हाळी परीक्षा-२०२४ करीता लेखनिक मिळणे बाबत.
संदर्भ :- १. शासन निर्णय क्रं.संकिर्ण-२०१६/पत्र क्रं.३०२/विशि-३/ दि.०४.०३.२०१७

उपरोक्त मंडळाच्या नियमाप्रमाणे उन्हाळी परीक्षेसाठी द्विव्यांग विद्यार्थ्यांना अतिरिक्त वेळ व लेखनिक देणेसाठी आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यात येत आहे.

मंडळाच्या RG-१०(G) प्रमाणे ज्या द्विव्यांग विद्यार्थ्यांनी लेखनिक (Writer) साठी आपल्याकडे विनंती केली आहे. त्या विद्यार्थ्यांची यादी व लेखनिकची माहिती खालील तक्त्यात Excel Format मध्ये सादर करावी.

| Sr. No | Inst. Code | Inst. Name | Enrollm ent No. | Student Name | Course Code | Disability Type | Request for Writer(Yes/No) | Writer Name |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

लेखी परीक्षेसाठी लेखनिक मिळणेबाबत खालील आवश्यक कागदपत्रे:

०१. संस्था प्रमुखांचा सही व शिक्का नमूद केलेले संस्थेचे पत्र.
०२. संबंधित विद्यार्थ्याचा अर्ज.
०३. विद्यार्थी असमर्थ असल्याबाबतचे शासकीय शल्यचिकित्सक डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
०४. लेखनिक म्हणून बसणा-या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे बोनाफाईड सर्टिफिकेट.
०५. लेखनिक म्हणून बसणा-या विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या शाळाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
०६. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा तांत्रिक शिक्षण न घेतलेला व १० वी पर्यंतच शिकलेला असावा.
०७. लेखनिक म्हणून बसणारा विद्यार्थी हा परीक्षार्थीचा नातेवाईक आणि संस्थेचा कर्मचारी नसावा.

लेखनिकांची व्यवस्था पालकांनी महाविद्यालयाचे सहकार्याने करावी अन्यथा महाविद्यालयाने लेखनिकांची यादी ठेवावी व या यादीतून लेखनिक देण्यात यावा. आवश्यकतेनुसार सांकेतिक भाषा विश्लेषक (Sign Language Interpreter) उपलब्ध करुन दयावा.

उपरोक्त अर्ज हे दि.११.०३.२०२४ पर्यंत या कार्यालयास प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच संस्थेच्या पत्रात संस्था प्रमुखांचा तसेच सदर विषय हाताळणा-या लिपिकाचा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी (Mobile No.& E-Mail ID) नमूद करणे अपरिहार्य आहे. सदरची माहिती प्रथम प्राधान्याने पाठवावी. जेणेकरुन द्विव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिकची सुविधा देण्यात मान्यता देणे शक्य होईल.

जर परीक्षेआधी एक किंवा दोन दिवस संस्थाकडून अर्ज प्राप्त झाले व त्यानंतर संस्था प्रतिनिधींनी दूरध्वनीद्वारे सदर प्रकरणास निपटारा करण्यास घाई केली व सदरचे पत्र टपाल खात्याकडून संस्थेस उशिरा प्राप्त झाले व त्यामुळे जर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले तर या गोष्टीस संस्था प्रमुख जबाबदार राहतील,याची नोंद घ्यावी.

अपवादात्मक परिस्थितीत जसे एखादया विद्यार्थ्याचा अचानक अपघात झाला किंवा अचानक नैसर्गिक दुर्घटना परिक्षार्थीच्या बाबतीत घडली तरच अशा अर्जाचा विचार करण्यात येईल.

कोणताही द्विव्यांग विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची खबरदारी प्राचार्यांनी घ्यावी.

21.2.24

( अक्षय ध. जोशी )
उपसचिव,
म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, प्रा.का.छत्रपती संभाजीनगर

प्रत:- मा.सचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.